**<u>ठळक बातम्या</u>**

- अनुसूचित जाती प्रवर्गात आणखी उपवर्गवारी करणं, आणि वेगवेगळा कोटा देणं चुकीचं नसल्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा
- आपत्ती व्यवस्थापन सुधारणा विधेयक २०२४ लोकसभेत सादर
- गेल्या महिन्यात दक्षिण गाझात केलेल्या हवाई हल्ल्यात हमास सेनेचा प्रमुख मोहम्मद डेईफ मारला गेल्याची इस्रायली सैन्याकडून पुष्टी
- राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी पहिल्यांदाच २५ हजाराच्या वर बंद

**आणि**

- पॅरिस ऑलिंपिकमधे स्वप्नील कुसळेनं नेमबाजीत पटकावलं कांस्यपदक, महाराष्ट्र सरकारकडून १ कोटी रुपयांचा पुरस्कार जाहीर

**<><><><><>**

आरक्षणाचा फायदा अधिक मागासांना मिळावा या दृष्टीनं राज्य सरकारांनी अनुसूचित जाती प्रवर्गात आणखी उपवर्गवारी करायला, आणि त्यांना स्वतंत्र कोटा द्यायला हरकत नसल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयानं दिला आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली संविधान पीठानं आज ६ विरुद्ध १ असा हा निर्णय दिला. अनुसूचित जाती आणि जमातींमधे आर्थिक आणि सामाजिक स्तरांमधे प्रचंड विविधता असून त्यामुळे सर्व प्रकारच्या मागास वर्गांना एकाच वर्गात बसवणं योग्य नाही असं सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी निकालात म्हटलं आहे. त्याचं प्रमाण ठरवण्याचा अधिकार राज्यसरकारांना असून अशा प्रकारचं आरक्षण देता येईल असं न्यायालयानं स्पष्ट केलं आहे.

मात्र एखाद्या उपवर्गाला १०० टक्के आरक्षण देता येणार नाही, तसंच अधिक मागासांना पुरेसं प्रतिनिधित्व मिळालं नसल्याचा प्रत्यक्ष डेटा आवश्यक राहील, असं न्यायालयानं स्पष्ट केलं आहे. अनुसूचित जाती , जमातींमधली क्रीमी लेयर ठरवण्यासाठी राज्यसरकारांनी धोरण निश्चित करावं आणि त्यांना आरक्षणातून बाहेर काढावं असं न्यायमूर्ती भूषण गवई यांनी म्हटलं आहे. याखेरीज विक्रम नाथ, पंकज मिथल, मनोज मिसरा आणि सतीश चंद्र शर्मा या न्यायमूर्तींनी या निवाड्याच्या बाजूनं कौल दिला. न्यायमूर्ती बेला त्रिवेदी यांनी मात्र विरोधात निर्णय दिला आहे.

<><><><><>

केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी आपत्ती व्यवस्थापन (सुधारणा) विधेयक २०२४ आज लोकसभेत सादर केलं. या विधेयकाअन्वये २००५च्या आपत्ती व्यवस्थापन कायद्यात बदल करून राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांची कार्यपद्धती बळकट करण्यात येईल. जल जीवन मिशनअंतर्गत देशभरात १५ कोटीपेक्षा जास्त नळ जोडण्या देण्यात आल्याची माहिती जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासाला दिली.

दरम्यान, वायनाडमध्ये दरड कोसळून झालेली दुर्घटना ही गंभीर स्वरूपाची दुर्घटना म्हणून सरकारने घोषित करावी, अशी मागणी काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांनी केली. यासंदर्भात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना पत्र लिहिलं असल्याचं त्यांनी संसद भवनाच्या आवारात बातमीदारांशी बोलताना सांगितलं. सरकारनं ही घोषणा केल्यानंतर खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजनेअंतर्गत मदत आणि पुनर्वसनाच्या कामासाठी एक कोटी रुपये देणार असल्याचंही थरूर यांनी नमूद केलं.

<><><><><>

देशातल्या विविध क्रीडा प्रकारांशी संबंधित १३ हजारापेक्षा जास्त खेळाडू, प्रशिक्षक आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांचा राष्ट्रीय क्रीडा प्राधिकरण विशेष वैद्यकीय योजने अंतर्गत विमा उतरवत असून, खेळताना होणाऱ्या दुखापती आणि आरोग्य विषयक इतर समस्यांपासून त्यांना संरक्षण दिलं जातं अशी माहिती क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांनी आज राज्यसभेत एका लेखी उत्तरात दिली. यामध्ये पाच लाख रुपयांपर्यंत वैयक्तिक विमा आणि अपघाती मृत्यू अथवा गंभीर दुखापतीसाठी २५ लाख रुपये अतिरिक्त विमा रकमेचा समावेश असल्याचं ते म्हणाले.

देशातल्या विविध उच्च न्यायालयांमध्ये न्यायाधीशांची ३५९ पदं रिक्त असल्याची माहिती कायदा आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी आज राज्यसभेत एका लेखी उत्तरात दिली. देशभरातल्या जिल्हा आणि कनिष्ठ न्यायालयांमधेही न्यायाधीशांची ५ हजार २३८ पदं रिक्त असून ही पदं भरण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरु असल्याचं त्यांनी सांगितलं.

राज्यसभेत आज कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या कामकाजावर चर्चा झाली. २०२२ साला पर्यंत शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्याचं आश्वासन पूर्ण करण्यामध्ये सरकार अपयशी ठरल्याची टीका, काँग्रेसचे रणदीप सिंग सुरजेवाला यांनी केली. तर सरकारनं शेतकऱ्यांच्या हितासाठी स्वामिनाथन समितीचा अहवाल लागू केल्याचं भाजपचे सुरेंद्र सिंह नागर यांनी चर्चेत सहभागी होताना सांगितलं.

<><><><><>

देशात रेल्वे अपघाताच्या घटना रोखण्यासाठी सरकार वचनबद्ध असून, यूपीए सरकारच्या राजवटीच्या तुलनेत रेल्वे अपघातांची संख्या ६८ टक्के कमी झाल्याचं सरकारनं आज स्पष्ट केलं. रेल्वे मंत्रालयाच्या अनुदानाच्या मागणीवर आज

लोकसभेत झालेल्या चर्चेला उत्तर देताना रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही माहिती दिली. रेल्वे सुरक्षेवर अधीक भर देण्याची गरज असून, यंदाच्या अर्थसंकल्पात रेल्वेमधल्या सुरक्षा उपायांसाठी १ लाख ८ हजार कोटी रुपयांहून अधीक रकमेची तरतूद केल्याचं त्यांनी सांगितलं.

प्रधानमंत्री सहज बिजली हर घर योजने अंतर्गत देशातल्या २ कोटी ८६ लाख कुटुंबांना वीज जोडणी देण्यात आल्याचं ऊर्जा राज्य मंत्री श्रीपाद नाईक यांनी आज लोकसभेत एका लेखी उत्तरात सांगितलं. सौभाग्य योजने अंतर्गत देशाच्या ग्रामीण आणि शहरी भागातल्या प्रत्येक कुटुंबाला वीज जोडणी देण्यात आल्याचं ते म्हणाले.

लोकसभेत आज शिक्षण मंत्रालयाशी संबंधित अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा झाली. गेल्या १० वर्षात देशाच्या शिक्षण क्षेत्रातल्या पायाभूत सुविधा आणि दर्जामध्ये लक्षणीय सुधारणा झाल्याचं भाजपाचे तेजस्वी सूर्या यांनी चर्चेला सुरुवात करताना सांगितलं. काँग्रेसचे मोहम्मद जावेद यांनी शाळा आणि महाविद्यालयांमधल्या रिक्त पदांचा मुद्दा उपस्थित केला. तर, केंद्र सरकारची धोरणं देशातला शिक्षणाचा दर्जा उंचावण्यामध्ये अपयशी ठरल्याचा आरोप तृणमूल काँग्रेसच्या प्रतिमा मंडल यांनी केला.

**<><><><><>**

जल जीवन मिशन अंतर्गत, सरकारनं देशभरात १५ कोटीहून अधिक नळ जोडण्या दिल्या आहेत, अशी माहिती जल शक्ती मंत्री सी आर पाटील यांनी लोकसभेत एका पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात दिली.

**<><><><><>**

लोकमान्य टिळक यांच्या शतकोत्तर चौथ्या पुण्यतिथी निमित्त, तसंच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या शतकोत्तर चौथ्या जयंती दिनानिमित्त आज त्यांना सर्वत्र आदरांजली वाहण्यात आली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार यांनी लोकमान्य टिळक आणि अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन केलं.

अण्णाभाऊ साठे संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेचं उद्घाटन आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, तसंच उपमुख्यमंत्री दे◌ेवेंद्र फडनवीस आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत झालं.

आज राज्यभरातल्या विविध शासकीय कार्यालयांमध्येही लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना आदरांजली वाहण्यात आली.

छत्रपती संभाजीनगरचे उद्योजक सुशील तुपे यांनी अमेरिकेतल्या आंतरराष्ट्रीय तारे आणि अवकाश नोंदणी संस्थेत लोकशाहीरांच्या नावानं तारा नोंद केला आहे. आजपासून स्मार्टफोनवर ॲप्लिकेशनच्या माध्यमातून हा तारा पाहता येणार आहे.

**<><><><><>**

गेल्या महिन्यात गाझाच्या दक्षिण भागात केलेल्या हवाई हल्ल्यात हमासचा लष्करी प्रमुख मोहम्मद डेईफ मारला गेल्याची माहिती इस्त्रायली सैन्यानं दिली आहे. १३ जूनला गाझाच्या खान युनिस केलेल्या हल्ल्याचं लक्ष्य डेईफच होता. तो हमासची लष्करी शाखा असलेल्या कासम ब्रिगेडच्या प्रमुखांपैकी एक होता. त्यानं २० वर्षांहून अधिक काळ या दलाचं नेतृत्व केलं होतं. गेल्या वर्षी ७ ऑक्टोबर रोजी झालेल्या दक्षिण इस्त्रायलवरच्या हल्ल्याचा सूत्रधार डेईफ हाच होता, अशी माहिती इस्त्रायल सैन्याच्या अधिकृत सूत्रांनी दिली आहे.

**<><><><><>**

शेअर बाजारात आज सलग पाचव्या सत्रात तेजी राहिली. आज सकाळच्या सत्रात सेन्सेक्स आणि निफ्टिनं नवा उच्चांक नोंदवला होता. बाजार बंद होताना सेन्सेक्स १२६ अंकांनी वधारला आणि ८१ हजार ८६८ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ६० अंकांनी वधारला आणि २५ हजार ११ अंकावर बंद झाला.

**<><><><><>**

**पॅरिस ऑलिम्पिकमध्ये** आजचा दिवस भारतीय खेळाडूंसाठी संमिश्र ठरला. भारताच्या स्वप्निल कुसळेनं पुरुषांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन नेमबाजी प्रकारात आज कास्यपदकाला गवसणी घातली. त्यानं ४५१ पूर्णांक ४ दशांश गुणांची कमाई केली. चीनच्या युकुन लिऊ यानं सुवर्ण, तर युक्रेनच्या सेरही कुलिश यांनी रौप्यपदक पटकावलं. ५० मीटर रायफल थ्री पोझिशन नेमबाजी प्रकारात ऑलिम्पिक पदक जिंकणारा स्वप्निल हा पहिला भारतीय नेमबाज ठरला आहे. तसंच पॅरिस ऑलिम्पिकमधलं भारताचं हे तिसरं कास्यपदक आहे. दुसरीकडे महिलांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन्स प्रकारात अंजुम मौदगील आणि सिफ्त कौर या पात्रता फेरीत जाण्यात अपयशी ठरल्या.

**मुष्टियुद्ध** स्पर्धेत निखत जरीन हिला ५० किलो वजनी गटात सोळाव्या फेरीत चीनच्या अव्वल मानांकित वू यू हिच्याकडून पराभव पत्कारावा लागला. तर हॉकीमध्ये पात्रता फेरीत भारतीय संघाला बेल्जियमनं २-१ असं पराभूत केलं. बॅडमिंटनच्या पुरुष दुहेरीत भारताच्या सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीला मलेशियाच्या आरोन चिया आणि सोह वुई यीक या जोडीने २१-१३, १४-२१,१६-२१ असं हरवलं.

**<><><><><>**

ऑलिम्पिक स्पर्धेत नेमबाजीत कास्यपदकाला गवसणी घालणारा नेमबाज स्वप्नील कुसळेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी स्वप्नीलचं अभिनंदन केलं आहे. एकाच ऑलिम्पिकमध्ये भारतानं नेमबाजीत तीन पदकं मिळवण्याची ही पहिलीच वेळ असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. स्वप्नीलच्या समर्पण आणि चिकाटीमुळे जागतिक मंचावर संपूर्ण देशाला अभिमान वाटेल, अशी कामगिरी त्यानं केली असल्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या यशाबद्दल स्वप्नील कुसळेचं कौतुक केलं आहे. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनीही स्वप्नीलचं अभिनंदन केलं आहे. त्याची जिद्द, चिकाटी आणि परिश्रमाला सलाम, असं त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वप्नील कुसळे याला एक कोटी रुपयांचा पुरस्कार जाहीर केला असून त्याच्या कुटुंबियांचं दूरध्वनीद्वारे अभिनंदन केलं. त्यांच्या पाठिंब्यामुळेच स्वप्नील या यशापर्यंत पोहोचू शकला, असं ते म्हणाले.

**<><><><><>**